# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

"उद्योग सारथी", महाकाली गुंफा मार्ग, मरोळ औद्योगिक क्षेत्र, अंधेरी (पुर्व) मुंबई — ४०० ०९३

दुरध्वनी क्र. ०२२-४७४८८३१२ / ४७४८४६९९ /४७४८४६७९ ईमेल : gmhrrecruitment@midcindia.org

मदत केंद्र क्र.: ०२२-४८२५६४३८/३९ संकेतस्थळ - www.midcindia.org

(वेळ सकाळी १०.३० ते सायं ५.३०) शुध्दीपत्रक क्रमांक — ०२/२०२३

---

## सरळसेवा भरती २०२३ जाहिरात शुध्दीपत्रक - २

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील सरळसेवा भरती २०२३ अंतर्गत गट - अ, गट-ब आणि गट-क पदभरती करीता जाहिरात क्र. १/२०२३ दि. १४/०८/२०२३ रोजी दैनिक वृत्तपत्रांमध्ये प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच शुध्दीपत्रक क्र. १ दि. ३१/०८/२०२३ रोजी प्रसिध्द केले आहे. सदर जाहिरातीच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे शुध्दीपत्रक-२ निर्गमित करण्यात येत आहे.

१. **माजी सैनिकांकरीता आरक्षण :-** (मूळ जाहिरातीतील अ.क्र. ६, पृष्ठ क्र. ३२ व ३३)

दि. ०२.०९.१९८३ च्या शासन निर्णयानुसार ऑनलाईन अर्ज सादर करताना खालील प्रमाणे विकल्प उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

- युध्दात / सैन्य दलातील सेवेत मृत पावलेल्या किंवा अपंग झालेल्या सैनिकांचे कुटुंबीय आहात काय ?

हा विकल्प ऑनलाईन अर्जामध्ये, अर्जदार दिव्यांग माजी सैनिक आहे काय ? ह्या विकल्पाच्या नंतर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

२. **अग्निशमन विमोचक या पदाकरीता कमाल वयोमर्यादा :-** (मूळ जाहिरातीतील अ.क्र. २३ (II), पृष्ठ क्र. ५५)

अ.क्र. २३ (II) मध्ये खालील मुद्दा क्र.(c) चा अंतर्भाव करण्यात येत आहे.

c. i) अग्निशमन विमोचक या पदाकरीता अर्ज सादर करण्यासाठी अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती / विमुक्त जाती (अ) / भटक्या जमाती (ब) / भटक्या जमाती (क) / भटक्या जमाती (ड) / विशेष मागास प्रवर्ग / इतर मागासवर्गीय / आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक व अनाथ या प्रवर्गातील उमेदवारांना कमाल वयोमर्यादेत ५ वर्षे इतकी शिथिलता अनुज्ञेय करण्यात येत आहे.

ii) माजी सैनिकांकरीता सशस्त्र दलात झालेली सेवा अधिक ३ वर्ष इतकी वयामध्ये सवलत देण्यात येत आहे.

iii) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक सनिव२०२३/प्र.क्र.१४/कार्या-१२, दि. ०३ मार्च २०२३ रोजीचे शासन निर्णयानुसार, ज्या पदांसाठी संबंधित पदाच्या सेवाप्रवेश नियमात विवक्षित कारणास्तव दि. २५/०४/२०१६ मध्ये विहित केलेल्या कमाल वयोमर्यादेपेक्षा भिन्न कमाल वयोमर्यादा विहित केलेली आहे, अशा पदांसाठी देखील या शासन निर्णयाच्या दिनांकापासून ते दि. ३१ डिसेंबर, २०२३ पर्यंत शासकीय सेवेत सरळसेवेने नियुक्ती संदर्भात प्रसिध्द होणा-या सर्व जाहिरांतीकरीता अर्ज करणा-या उमेदवारांसाठी संबंधित पदाच्या सेवा प्रवेश नियमात केलेल्या कमाल वयोमर्यादेत दोन वर्षे इतकी शिथिलता देय राहिल.

३. **विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड) मधील पदाबाबत:-** (मूळ जाहिरातीतील अ.क्र. २.३ व २.१७ , पृष्ठ क्र. २६ व २७)

२.१७.१ महाराष्ट्र शासन यांचेकडील महाराष्ट्र राज्य लोकसेवा अधिनियम, २००१ मधील तरतुदीनुसार तसेच महामंडळाने प्रसिध्द केलेल्या जाहिराती मधील अटी व शर्ती च्या अनुषंगाने विमुक्त जाती (अ), भटक्या

जमाती (ब), भटक्या जमाती (क) व भटक्या जमाती (ड) या प्रवर्गासाठी विनिर्दिष्ट केलेले आरक्षण अंतर्गत परिवर्तनीय असल्यामुळे ऑनलाईन अर्ज सादर करताना खालील तक्त्यामध्ये नमुद संवर्गाकरीता अर्जदाराची जात व कोणत्या प्रवर्गातून अर्ज करीत आहात? हे पर्याय विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क) व भटक्या जमाती (ड) यापैकी कोणत्याही प्रर्वगासाठी पद आरक्षित असले तरी अर्जदाराची जात व कोणत्या प्रवर्गातून अर्ज करीत आहात? हे दोन्ही पर्याय या सर्व चारही प्रवर्गासाठी ऑनलाईन प्रणालीमध्ये उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

२.१७.२ विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क) व भटक्या जमाती (ड) या प्रवर्गांसाठी आरक्षित पदांसाठी संबंधित प्रवर्गातील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यासच अद्ययावत शासन धोरणाप्रमाणे अन्य प्रवर्गातील (विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क) व भटक्या जमाती (ड) आवश्यकते नुसार) उमेदवारांचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

२.१७.३ खालील तक्त्यामध्ये नमुद संवर्गासाठी विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क) व भटक्या जमाती (ड) या प्रवर्गातील उमेदवारांनी त्या त्या प्रवर्गात पद नसल्याने परंतु अराखीवसाठी पद उपलब्ध असल्याने, आपला संबंधित प्रवर्ग अर्ज करताना निवडला असेल परंतु अर्ज अराखीव जागेसाठी केला असेल तरीही त्यांनी नव्याने अर्ज सादर करणे आवश्यक आहे. त्यासाठी त्यांनी या चारही प्रवर्गासाठी आवश्यक असणा-या अटी व शर्तीची पूर्तता (उदा. जात व जात वैधता प्रमाणपत्र, उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र, वगैरे) करणे आवश्यक राहील.

| अ.क्र | पदाचे नाव | अ.क्र | पदाचे नाव |
|---|---|---|---|
| १. | कार्यकारी अभियंता (स्थापत्य) - गट — अ | १०. | कनिष्ठ अभियंता (विद्युत / यांत्रिकी) - गट - क |
| २. | उप अभियंता (स्थापत्य) - गट — अ | ११. | लघुलेखक (उच्च श्रेणी) - गट - क |
| ३. | उप अभियंता (विद्युत / यांत्रिकी) - गट — अ | १२. | लघुटंकलेखक - गट - क |
| ४. | उप रचनाकार - गट — अ | १३. | वरिष्ठ लेखापाल - गट - क |
| ५. | उप मुख्य लेखा अधिकारी - गट — अ | १४. | तांत्रिक सहाय्यक (श्रेणी-२) - गट - क |
| ६. | सहाय्यक अभियंता (विद्युत / यांत्रिकी) - गट - ब | १५. | सहाय्यक आरेखक - गट - क |
| ७. | सहाय्यक रचनाकार - गट — ब | १६. | भूमापक - गट - क |
| ८. | क्षेत्र व्यवस्थापक - गट - ब | १७. | कनिष्ठ संचार अधिकारी - गट - क |
| ९. | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) - गट — क | १८. | चालक यंत्र चालक - गट - क |

**४. तांत्रिक सहाय्यक (श्रेणी-२) पदाच्या शैक्षणिक अर्हतेबाबत:-** (मूळ जाहिरातीतील अ.क्र. २१, पृष्ठ क्र. १४)

तांत्रिक सहाय्यक (श्रेणी-२) या पदाकरीता ऑनलाईन अर्ज सादर करतेवेळी शैक्षणिक अर्हतेबाबतची माहीती भरतांना खालील प्रमाणे विकल्पामध्ये सुधारणा करण्यात येत आहे.

- Have You Passed the Course of Draftsman (Civil/Mechanical/Electrical) Of Government Recognized Industrial Polytechnic Institute or Industrial Training Institute?"

**५. वीजतंत्री (श्रेणी-२) पदाच्या शैक्षणिक अर्हतेबाबत:-** (मूळ जाहिरातीतील अ.क्र. २२, पृष्ठ क्र. १५)

वीजतंत्री (श्रेणी-२) या पदाकरीता ऑनलाईन अर्ज सादर करतेवेळी शैक्षणिक अर्हतेबाबतची माहीती भरतांना खालील प्रमाणे विकल्पामध्ये सुधारणा करण्यात येत आहे.

- Have You Completed the Electrician Course from Government Or Government Recognized Industrial Training Institute?

६. उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. आयडीसी-२०२३/प्र.क्र.७९५/उद्योग -१४, दि.१५ सप्टेंबर, २०२३ नुसार होमगार्डमध्ये किमान ३ वर्षे इतकी सेवा झालेल्या व अग्निशमन विमोचक पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता व शारिरीक पात्रता पूर्ण करणा-या व विहित पात्रता परीक्षा उत्तीर्ण होणा-या उमेदवारांकरीता एकूण भरण्यात येणा-या अग्निशमन विमोचक पदांच्या ५ % प्रमाणे समांतर आरक्षण होमगार्ड यांना लागू करण्यात येत आहे. त्यानुसार अग्निशमन विमोचक या पदाचे आरक्षणामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे. (मुळ जाहिरातीतील अ.क्र. १ मधील अ.क्र. ३४, पृष्ठ क्र. २५)

**अग्निशमन विमोचक गट - क  एकुण पदे - १८७**

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | आ.दु.घ. | अराखीव पदे | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **पदसंख्या** | २३ | १४ | २ | २ | ४ | १ | ३ | २७ | १८ | ९३ | १८७ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक / समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे:- | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ८ | ४ | १ | १ | २ | १ | २ | ८ | ५ | २५ | **५७** |
| महिला | ७ | ४ | १ | १ | १ | ० | १ | ८ | ५ | २८ | **५६** |
| माजी सैनिक | ३ | २ | ० | ० | १ | ० | ० | ४ | ३ | १४ | **२७** |
| खेळाडू | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | ५ | **९** |
| प्रकल्पग्रस्त | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | ५ | **९** |
| भुकंपग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | २ | **३** |
| पदवीधर अंशकालीन कर्मचारी | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | ३ | २ | ९ | **१७** |
| होम गार्ड | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | ५ | **९** |
| अनाथ | २ (संस्थात्मक — १ पद व संस्थाबाह्य — १ पद) | | | | | | | | | | |

**स्वाक्षरीत**

(तुषार मठकर)

महाव्यवस्थापक (मबवि)

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

स्थळ :- मुंबई

दिनांक :- १६/०९/२०२३